# उल्हासनगर महानगरपालिका
## सार्वजनिक बांधकाम विभाग

दिनांक : ०२/०८/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

उल्हासनगर महानगरपालिकास्तरीय "विशेष मिशन इंद्रधनूष्य मोहिम ५.० " CTF बैठक दिनांक ०१/०८/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता स्थायी समिती सभागृह, उल्हासनगर महानगरपालिका येथे श्री. अजीज शेख, मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. अजीज शेख | मा. प्रशासक तथा आयुक्त | :- अध्यक्ष |
| २. डॉ. करूणा जुईकर | मा.अतिरिक्त आयुक्त, (वै.आ.वि) | :- उप-अध्यक्ष |
| ३. डॉ. सुभाष जाधव | उप-आयुक्त (वै.आ.वि) | :- सदस्य |
| ४. डॉ. मोहिनी धर्मा | वैद्यकिय आरोग्य अधिकारी | :- सदस्य सचिव |
| ५. श्री. छाया पी. डांगळे | पीआरओ | :- सदस्य |
| ६. श्रीम. विजया कुंभार | ICDS प्रतिनिधी | :- सदस्य |
| ७. श्रीम. सलोनी निमकर | शिक्षण विभाग | :- सदस्य |
| ८. श्रीम. विशाल कदम | प्रशासकीय अधिकारी | :- सदस्य |
| ९. श्री. संतोष मोरे | माहिती तंत्रज्ञान विभाग | :- सदस्य |
| १०. वैद्यकीय अधिकारी, | नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- १ ते ६, उमपा | :- सदस्य |
| ११.श्रीम. प्रिया आखडे | स्नेहा फाऊंडेशन- NGO | :- सदस्य |
| १२. डॉ. किशोर चव्हाण, | SMO | :- सदस्य |

सदर बैठकीची सुरूवात श्रीम. संगिता चौधरी, आयएफएम, यांनी प्रस्तावना सादर करत व सर्व मान्यवरांचे स्वागत करून, विशेष मिशन इंद्रधनूष्य ५.० मोहिमेमध्ये ० ते ५ वर्ष वयोगटातील लसीकरणा पासून वंचित राहिलेले लाभार्थी तसेच गरोदर माता यांना शोधने व त्यांचे लसीकरण करणे या बाबत माहिती दिली. तद्नंतर डॉ. किशोर चव्हाण, सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर, ठाणे (SMO) यांनी "विशेष मिशन इंद्रधनूष्य मोहिम ५.०" या अभियानाची संपूर्ण रूपरेषा Power Point Presentation द्वारे उपस्थितांना दिली.

सदर बैठकीत मा. उपआयुक्त, डॉ. सुभाष जाधव यांनी सदर मोहिमेची जनजागृती अति उत्कृष्ट करण्यासाठी बॅनर, पोस्टर, माईकिंग पॅम्पलेट्स छपाई करण्याचे सुचित केले तसेच जनजागृती करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्याचे आव्हान केले. सदर बैठकीचे उपाध्यक्ष मा. अतिरिक्त आयुक्त डॉ. करूणा जुईकर यांनी लसीकरणापासून वंचित राहिलेले लाभार्थी शोधून त्यांचे लसीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले. सदर बैठकीचे अध्यक्ष मा. प्रशासक तथा आयुक्त, श्री. अजीज शेख, यांनी एकही लाभार्थी लसीकरणा पासून वंचित न राहण्याबाबत व सदर मोहिमेची १००% अंमलबजावणी करण्यास वैद्यकिय आरोग्य विभागाला आदेशित केले.

तसेच ""विशेष मिशन इंद्रधनूष्य मोहिम ५.० " हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व विभागांनी योग्य सहकार्य करणे बाबत सर्व समिती सदस्यांना आदेशित करण्यात आले व उपस्थित सर्व समिती सदस्यांचे सदस्य सचिव डॉ. मोहिनी धर्मा यांनी आभार मानुन मा. अध्यक्ष यांच्या समतीने सभा संपल्याचे घोषित करण्यात आले.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत –माहितीस्तव सादर.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१. पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२. सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेसनोट उल्हासनगर महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.